

# श्रीगुरुदेव दत्त



१८६८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू प्रवास
सं. क्र. ५०७



REFBK-0017200

# श्री गुरुदेव दत्त

## औदुंबर – नरसोबाची वाडी

धन्य कृष्णातीर धन्य औदुंबर ।
जेथें गुरुवर वसतसे ॥
— जनार्दनस्वामी

रामचन्द्र चिन्तामण ढेरे

किंमत
७५
नये पैसे

सांस्कृतिक महाराष्ट्र ग्रंथ – मा


५५६७ ५१७
२२।३।५७
५०७
क्र. १७७०७
ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०
७५२७ अभ्यास
५०७ २२।३।५७
REFBK-0017200



ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
व्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री. ९५ : २ [ १२-६० ]

© १९५८

वोरा अँण्ड कंपनी, पब्लिशर्स प्रा. लि.

•

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शनमाला : ८

•

आवृत्ति पहिली : १९५८
पुनर्मुद्रण : १९६७

•

किंमत ७५ नये पैसे

•

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांची ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य व बोलकीं शब्दचित्रें

•

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा लि करितां,
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

•

मुद्रक :

जयराम दिपाजी देसाई
राष्ट्रवैभव प्रेस,
गिरगांव, मुंबई नं. ४


## सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केंद्रांचीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें. तेथील सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमि; त्या त्या स्थानातील महत्त्वाच्या मूर्तींचीं, स्थळाची सुरेख विश्वसनीय चित्रें; तेथें जाण्याचे रस्ते, तेथील उत्सव, दर दिवशींचे कार्यक्रम यांची माहिती देणारीं मार्गदर्शक पुस्तकें. या पुस्तकातील भावना फुलविणारा इतिहास आणि डोळसपणा देणारी माहिती वाचून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दर्शनाचें समाधान अवश्य लाभेल.

- मोठा, जाड टाइप; सोपी भाषा; आकर्षक मांडणी.
- हीं पुस्तकें म्हणजे घरबसल्या महाराष्ट्रांतील तीर्थयात्रा आणि संतदर्शनें, भाविक यात्रेकरूंना आणि चिकित्सक प्रवाश्यांनाहि मार्गदर्शक. शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांना अति उपयुक्त.
- डायरेक्टर ऑफ् एज्युकेशन मुंबई राज्य-कडून शालेय ग्रंथालयांसाठीं शिफारस
- लोकशिक्षण समिति, महाराष्ट्र विभाग यांच्याकडून प्रौढ साक्षरांसाठीं पुरस्कृत
- असिस्टंट क्युरेटर ऑफ् लायब्ररीज, महाराष्ट्र विभाग यांनीं सार्वजनिक वाचनालयांकरितां विशेष शिफारस केलेली.

वा. क. १५२६२
शाखा (व्यंक

# श्री गुरुदेव दत्त

अमृतवाहिनी कृष्णा :

मराठी संस्कृतीच्या भरणपोषणांत गोदावरीइतकेंच कृष्णेचें स्थान आहे. ती महाबळेश्वराच्या गिरिमाथ्यावर उगम पावते आणि अनेक सख्या-साजणींशीं सहकार करून पूर्वसागराला मिळते. कऱ्हाडजवळ कोयना, सांगलीजवळ वारणा, कुरुंदवाडजवळ पंच-गंगा, विजापूर जिल्ह्यांत मलप्रभा-घटप्रभा, रायचूरजवळ तुंगभद्रा आणि नळगोंडा जिल्ह्यांत मुसी अशा सात सख्यांशीं खेळी-मेळी करीत तिची जीवन-यात्रा चालू आहे. सहकारानें जीवनाला समृद्धि प्राप्त होते आणि उपकारानें त्याला चिरंतन यशाचें लेणें चढतें, हा कृष्णेचा संदेश आहे. सहकार आणि उपकार हा तिचा स्वभाव आहे. त्याचमुळें तिचा प्रवाह बाराहि महिने विपुल जळराशि घेऊन वहात असतो आणि तिच्या तीरावर हिरवे मळे बहरलेले असतात. कोल्हापूर विभागांतील कृष्णाकांठचे ऊंस-मळे पाहिले कीं, कृष्णेच्या हृदयांतील अमाप गोडवा जाणवूं लागतो. पण कधीं कधीं ही कृष्णामाई विराट् आणि भीषण स्वरूप धारण करते. वर्षेच्या सहस्रधारा कोसळूं लागल्या कीं, ती रौद्र स्वरूप धारण करते आणि तिचा प्रवाह उत्पात मांडीत धांवूं लागतो. अर्थात् हें तांडव कांहीं काळच चालतें. पुनः ती संथ-गंभीर बनते आणि मायाळू मनानें पीडितांना गोंजारूं लागते.

या कृष्णेच्या कांठींच सतराव्या शतकांत श्रीसमर्थांनीं स्वराज्याची निष्ठा निर्माण करण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मुसलमानांच्या टाचेखालीं चिरडली जाणारी मराठी जनता पाहून, समर्थांनीं स्वधर्म आणि स्वदेश यांच्या उद्धारासाठीं कृष्णाकांठींच चळवळीचें लोण पसरविलें. समर्थांच्या इच्छा–आकांक्षा साकार करण्यासाठीं त्या काळीं शिवछत्रपतींसारखा महापुरुष निर्माण झाला आणि महाराष्ट्र स्वतंत्र बनला.

परंतु या कार्याची जाणीव जाणत्या पुरुषांना त्यापूर्वी दोन शतकें झाली होती. म्लेंच्छांनीं मांडलेल्या हलकल्लोळांतून समाजाला मुक्त करावयास हवें, आपल्या परंपरांची जपणूक करावयास हवी आणि निराश होऊं लागलेल्या मनांना दिलासा द्यावयास हवा, अशी तीव्र जाणीव असणारा एक महापुरुष चौदाव्या शतकांत कृष्णाकांठीं वावरत होता : त्याचें नांव श्रीनरसिंहसरस्वती. नरसिंह-सरस्वतींचा जन्म वऱ्हाडांतला; परंतु कृष्णाकांठ हीच त्यांनीं आपली कर्मभूमि बनविली. त्यांच्या वास्तव्यानें, तपानें आणि लोकोद्धाराच्या कार्यानें कृष्णाकांठीं औदुंबर आणि नरसोबाची वाडी हीं दोन पवित्र क्षेत्रें निर्माण झालीं आहेत.

### श्रीक्षेत्र औदुंबर

यांपैकीं औदुंबर हें क्षेत्र, पुण्याहून हुबळीकडे जाणाऱ्या दक्षिण लोह-मार्गावर किर्लोस्करवाडीच्या पलीकडे भिलवडी स्टेशन-पासून चार मैलांवर आहे. कृष्णा नदीच्या ऐलतीरावर भिलवडी आहे आणि पैलतीरावर औदुंबर आहे. स्टेशनपासून औदुंबरास जाण्यासाठीं टांगे मिळतात. हे टांगे उन्हाळ्यांत नदींत बांधलेल्या फरसबंदी रस्त्यावरून जातात. पावसाळ्यांत मात्र नावेचा आश्रय घ्यावा लागतो. औदुंबर गांवांत पंधरा-वीस ब्राह्मण पुजाऱ्यांचीं

घरें आहेत. तेथें रहाण्या-जेवण्याची व्यवस्था अल्प खर्चांत होऊं शकते. शिवाय गांवांत दोन-तीन धर्मशाळाहि आहेत.

श्रीनरसिंहसरस्वती हे इतिहासकाळांतील श्रीदत्तात्रेयाचे दुसरे अवतार समजले जातात. त्यांच्या तपाच्या तेजानें, शास्त्रपूत आचारानें आणि बुद्धीच्या प्रभावानें महाराष्ट्रांत दत्तसंप्रदाय सर्वत्र प्रसार पावला. त्यांचें हें कार्य इतकें मोठें आहे कीं, लोक त्यांनाच दत्त-संप्रदायाचे प्रवर्तक मानतात. त्यांनीं सन १४४१ मध्यें औदुंबर येथें चातुर्मासांत वास्तव्य केलें, त्यामुळें औदुंबर हें महाराष्ट्रांत दत्तस्थान म्हणून विशेष प्रसिद्धि पावलें. नरसिंहसरस्वतींचा जन्म वऱ्हाडांत कारंजा या ठिकाणीं इ. स. १४०८ मध्यें झाला. त्यांची प्रज्ञा तीव्र असल्यामुळें बालपणींच त्यांनीं सर्व शास्त्राध्ययन पूर्ण केलें. वृत्तींत प्रथमपासूनच वैराग्य असल्यामुळें अल्पवयांतच त्यांनीं घर सोडलें आणि काशीस प्रयाण केलें. तेथें कृष्णसरस्वती नामक शांकरसंप्रदायी संन्याशाकडून त्यांनीं संन्यासदीक्षा स्वीकारली. त्यानंतर दोन तपांहून अधिक काळ तीर्थभ्रमण करीत आणि लोकांना धर्माचरणाला प्रवृत्त करीत कालक्रमणा करून इ. स. १४३८ च्या सुमारास ते कारंजास परत आले. तेथून पुनः त्र्यंबकेश्वर, नाशिक, वासर-ब्रह्मेश्वर, वैजनाथ, आंबेजोगाई अशीं तीर्थें पहात पहात ते कृष्णाकांठीं भिलवडी येथें आले. कृष्णेच्या पैल-तीरावर अंकलखोप नांवाचें गांव आहे आणि ऐलतीरावर भिलवडी-जवळ भुवनेश्वरी देवीचें देवालय आहे. भुवनेश्वरी हें शक्तिपीठ असल्यामुळें या परिसरांत तपस्वी जनांचा वावर नहमीं असे. कृष्णेच्या तीरावर वृक्षांच्या दाटीमुळें आपोआपच एकान्तमय तपोवन निर्माण झालें होतें. या निसर्गसिद्ध तपोवनांत, औदुंबरांच्या दाट शीतल छायेंत नरसिंहसरस्वतींनीं एक चातुर्मासाचा काळ घालविला आणि या स्थानाला चिरंतन पावित्र्य प्राप्त करून दिलें.


कांठावर, घाटावर। मंगल चारीहि प्रहर।
शुभ्र सारें, शुभ वारे। अणुरेणू येथिल शुभकर ॥

अशी येथील वातावरणाविषयीं कवीची साक्ष आहे. या पवित्र वातावरणांत कृष्णेच्या पवित्र पात्रांत स्नान करून आपणांस श्रीदत्तपादुकांचें दर्शन घ्यावयाचें आहे. हा स्नानाचा घाट प्रशस्त आहे. त्याची रुंदी चौतीस फूट असून त्याला सात बुरूज आहेत.

तुझ्या जळानें मनें आमुचीं तूं धवळित राही,
कृतज्ञभावें तुला वंदितों श्रीकृष्णामाई !

अशी कृष्णामाइची मनोमन प्रार्थना करून आणि शुचिर्भूत होऊन दत्तदर्शनाला जावयाचं. घाटावरून सरळ पादुकांपर्यंत जातां येतें. हा घाट येथील ब्रह्मानंदस्वामींचे शिष्य सहजानंदस्वामी यांनीं दत्तभक्तांकडून आर्थिक साहाय्य गोळा करून विसाव्या शतकाच्या प्रारंभीं बांधविला आहे.


श्रीदत्तपादुकांवरील सध्यांचें मंदिर लहानसेंच आहें. त्याचा आकार केवळ ६॥ फूट × ९ फूट इतका आहे. हें मंदिर इ. स. १८१० च्या सुमारास अंकलखोपचे देशपांडे यांनीं दत्तदृष्टान्त झाल्यामुळें बांधलें, असें सांगतात. इ. स. १८५० पासून औदुंबर येथें स्थायिक वस्ती होऊं लागली. शंभर वर्षांपूर्वीपर्यंत येथें वस्ती नव्हती. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास अंकलखोप गांवांतून पुजारी येथें येऊन राहिले. इ. स. १८६० मध्यें कृष्णाजी त्रिंबक बापट या नांवाच्या श्रद्धावान् गृहस्थांनीं या मंदिराचा जीर्णोद्धार केला. १८९६ च्या सुमारास बेळगांवच्या एका व्यापाऱ्यानें मंदिराच्या उत्तरेस व दक्षिणेस ओवऱ्या बांधून दिल्या. पावसाळ्यांत श्रींच्या पादुका कृष्णेच्या महापुरांत बुडून जातात आणि त्यामुळें नित्योपासना व दर्शन अशक्य होऊन बसतें.



श्रीदत्तपादुकांवरील मूळ मंदिर   औदुंबर

ही अडचण दूर करण्यासाठीं इ. स. १९२६ मध्यें श्री. प. ना. रानडे ( पुणें ) यांनीं आठ हजार रुपये खर्चून उंच जागीं एक देवघर बांधलें आहे. पावसाळ्यांत देव तेथें नेतात आणि तेथेंच पूजा-अर्चा होते. क्षेत्रांतील नित्यनैमित्तिक उपासनेसाठीं आणि व्यवस्थेसाठीं अनेक सरदार-संस्थानिकांकडून दानें व इनामें मिळालीं आहेत. अलीकडे 'औदुंबर भक्तमंडळा'नें बारा हजार रुपये खर्चून ४३ फूट × २६ फूट एवढ्या विस्ताराचा कॉंक्रीटचा मंडप बांधला असून, क्षेत्राच्या भावी विकासाची व्यापक योजना संकल्पिली आहे.

दत्तचरणांचें दर्शन घेऊन आपण प्रदक्षिणा करूं लागलों कीं बाजूच्या ओवऱ्यांतून एकदोघे निग्रही उपासक गुरुचरित्राचें पारायण करीत असतांना दिसतील. दत्तसंप्रदायांत कठोर तपा-चरणाला फार महत्त्व आहे. अत्यंत काटेकोरपणानें आचारधर्माचें पालन करणाराला दत्तसाक्षात्कार सुलभ होतो, अशी सांप्रदायिकांची




श्रीदत्तपादुका · औदुंबर

श्रद्धा आहे. प्रत्यक्ष दत्तात्रेयाचा अवतारहि, शिथिल होऊं लागलेल्या आचारधर्माचें संरक्षण करण्यासाठीं झाला, अशी पुराणांत कथा आहे. दत्तात्रेयाचा पहिला शिष्य कार्तवीर्य सहस्रार्जुन यानें घोर तप आचरिलें आणि दत्तात्रेयाची कृपा संपादन करून त्या कृपेच्या बळावर वर्णाश्रमधर्माला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. यदु, अलर्क, प्रल्हाद इत्यादि पौराणिक दत्तभक्त जणुं तपाचे हिमालयच होते. इतिहासकाळांतील गोरक्षनाथ, चांगदेव राऊळ, जनार्दनस्वामी, एकनाथ, दासोपंत, निरंजन रघुनाथ इत्यादि थोर दत्तभक्तांचीं नांवें आठवतांच त्यांच्या निग्रही तपाचरणाचा इतिहास आपणांला नतमस्तक बनवितो.

श्रीनरसिंहसरस्वती हेहि एक महान् तपोनिधि होते. त्यांचें चरित्रकथन करणारा 'गुरुचरित्र' हा ग्रंथ दत्तसंप्रदायांत वेदमंत्रांहून अधिक पूज्य मानला जातो. या ग्रंथांत वर्णाश्रमाधिष्ठित आचार-धर्मांचें विस्तृत विवरण केलें असून, त्या आचारपालनानें जीवनाचें कसें उन्नयन होतें, तेंहि सांगितलें आहे. ज्या ठिकाणीं स्वतः नरसिंहसरस्वती चार महिने एकांताचा आनंद लुटीत राहिले होते, त्या ठिकाणीं त्यांच्या चरित्राचें आणि उपदेशाचें चिंतन करीत रहाण्यांत औचित्य आहे. त्यामुळें आपोआपच तपाला अनुकूल मानसिक बैठक लाभते.


मंदिराच्या परिसरांत औदुंबर वृक्षांची घनदाट छाया आहे. आकाशांत सूर्य तळपत असतांना जमिनीवर छाया-प्रकाशाची जाळीदार रांगोळी तरळत रहाते. या औदुंबरांच्या छायेंतून मंदिर-प्रदक्षिणा करून, वरच्या 'आजोबा' वडाखालच्या वाटेनें गेलें कीं, ब्रह्मानंदस्वामींचा मठ लागतो. हे सत्पुरुष १८२६ च्या सुमारास गिरनारहून औदुंबरक्षेत्रीं आले आणि इथेंच एक मठी उभारून त्यांनीं तपश्चर्या केली. या शांत, प्रसन्न आणि पवित्र वातावरणांत त्यांच्या तपाला सिद्धीचें यश प्राप्त झालें. आणि अखेर इथेंच त्यांनीं समाधि घेतली. त्यांच्याबरोबर मेरुशास्त्री नांवाचे एक विद्वान् गृहस्थ होते. त्यांनीं ब्रह्मानंदांच्या साहाय्यानें 'हठयोग-प्रदीपिका' या योगशास्त्रावरील प्रसिद्ध संस्कृत ग्रंथावर 'ज्योत्स्ना' नांवाची टीका लिहिली. ब्रह्मानंदांचे शिष्य सहजानंदस्वामी यांनीं भक्त-भाविकांकडून वर्गणी गोळा करून औदुंबरचा प्रशस्त घाट बांधण्याचें सत्कार्य केलें. या ब्रह्मानंद मठांतच श्रीवासुदेवानंद-सरस्वती (दत्तसंप्रदायांतील एक अर्वाचीन सत्पुरुष) यांनीं आपल्या जीवनसाधनेचीं पहिलीं पावलें टाकलीं होतीं. आज या मठांत श्रीनारायणानंदतीर्थ या नांवाचे एक साधु रहात असतात.



ब्रह्मानंदस्वामींचा मठ औदुंबर

**श्रीभुवनेश्वरी :**

औदुंबराच्या पूर्वेस नदीच्या दुसऱ्या तीरावर श्रीभुवनेश्वरीचें मंदिर आहे. औदुंबर ते भुवनेश्वरी धर्मादाय नाव चालते. ही भुवनेश्वरी आणि सध्यां कृष्णेच्या पात्रांत बुडालेला सिद्धमठ हीं दोन पुरातन स्थानें आहेत. सिद्धमठांत प्राचीन काळीं कोणी मूळमाधव नांवाचा सिद्धपुरुष रहात असे. कृष्णदयार्णव नामक सतराव्या शतकांतील संतकवीच्या एका शिष्याचा मठहि असाच नदीच्या पात्रांत लुप्त झाला आहे. भुवनेश्वरी मात्र अजूनहि एका जीर्ण मंदिरांत उभी आहे. सध्यांच्या जीर्ण अवस्थेंतहि मंदिरावरील गोपुर प्रेक्षणीय आहे. सर्व मंदिराची बांधणी दगडी आहे. मंदिरासमोर एक दीपमाळ आहे.



श्रीभुवनेश्वरीचें मंदिर भिलवडी

एके काळीं जागृत शक्तिपीठ असलेलें हें स्थान आज भक्तांच्या अभावामुळें भकास बनलें आहे. चौदाव्या शतकांत, नरसिंहसरस्वतींच्या काळीं या स्थानाचा महिमा फार होता. या स्थानाशीं संबंधित अशी एक उग्र गंभीर घटना गुरुचरित्रांत वर्णिलेली आहे.

करवीर ( कोल्हापूर ) क्षेत्रांतील एका मंद बुद्धीच्या ब्राह्मणानें विद्याप्राप्तीसाठीं देवीपुढें धरणें धरलें. बुद्धीच्या दारिद्र्यामुळें घरींदारीं त्याची हेटाळणी होत असे. जननिंदेचा त्रास असह्य होऊन तो देवी भुवनेश्वरीच्या चरणीं प्रार्थना करूं लागला : 'माते, मला बुद्धीचा प्रसाद दे.' देवीच्या कृपेची वाट पहाण्याइतका त्याला धीर नव्हता. त्यानें वैतागानें हातीं शस्त्र घेतलें आणि देवीच्या समोर तो स्वतःची जीभ कापून टाकूं लागला. त्याच्या या आततायीपणाला प्रतिबंध करण्यासाठीं देवी प्रगट झाली आणि तिनें सांगितलें कीं, "असें कांहीं करूं नकोस. पैलतीरावर जा. तेथें औदुंबरातळीं एक तपोनिधि आहे. तो तुला बुद्धीचें देणें देईल."



श्रीभुवनेश्वरी देवी औदुंबर

देवीचा संदेश शिरीं धारण करून तो ब्राह्मण नरसिंह सरस्वतींकडे गेला आणि त्याचें मनोवांछित पूर्ण झालें.

आज मात्र ही भुवनेश्वरी एखाद्या धर्मशाळेंत विसावलेल्या असहाय भिक्षुणीसारखी उपेक्षित अवस्थेंत उभी आहे. तिची ती दैत्यविनाशिनी मूर्ति, तीं हातांतील आयुधें, तो मुखावरील रौद्र-भाव—हें सारें पाहून तर भोंवतालचा भकासपणा अधिकच सलूं लागतो.

वाडीच्या वाटेवर.

भुवनेश्वरीचें दर्शन घेऊन आणि औदुंबरांच्या स्निग्ध छायेंतील श्रीपादुकांचें स्मरण मनांत कोरून आपण भिलवडी

स्टेशन गांठतों. भिलवडीहून मिरज आणि मिरजहून कोल्हापूर मार्गावरील जयसिंगपूर. जयसिंगपूर हें मिरज–कोल्हापूर लोह-मार्गावरील पहिलेंच स्टेशन आहे. येथून फक्त आठ मैलांवर नरसोबाची वाडी आहे. जयसिंगपूरहून वाडीला जायला दिवसभर मोटारींची सोय आहे.

वाडीला जाणाऱ्या गाडींत पाऊल ठेवल्यावर मनांत भावी दर्शनाचें औत्सुक्य दाटून येतें. दत्तात्रेय, दत्तावतार आणि दत्तभक्त यांच्या लीलाचरित्रांच्या संस्मरणानें मन भारून जातें. दत्तात्रेय ही देवता भारतीय भक्तिपरंपरेंतील एक अद्‌भुत निर्मिति आहे. भारतीयांनीं प्राचीन काळापासून अनेक देवतांची अभिनव निर्मिति केली; परंतु त्या सर्व देवतांतून एकाच सर्वसाक्षी परमात्म्याचा अनुभव घेतला. प्रत्येक देवतेचें नांव निराळें, अवतार कथा निराळी, सगुणरूप निराळें आणि तरीहि या भिन्न भिन्न देवतांच्या भक्तांना येणारा अनुभव सदैव एकरूपच असतो. चतुर्भुज विष्णु, चतुर्मुख ब्रह्मा, तीन नेत्र असलेला स्मशानवासी शंकर, लंबोदर आणि शुंडाधारी असा मंगलमूर्ति गणेश, अष्टभुजा देवी, त्रिमुखी दत्तात्रेय या सर्व देवता रूपानें वेगळ्या असल्या तरी मानवाच्या हृदयासकट सर्व विश्वांत भरून उरलेल्या परमेश्वराचींच तीं प्रतीकें आहेत, असा भक्तांचा रोकडा अनुभव आहे.

दत्तात्रेय म्हणजे ब्रह्मा – विष्णु – महेशांची एकरूप त्रिमूर्ति. ‘तीन शिरें सहा हात’ असें रूप धारण करणारी ही देवता आपल्या समन्वयदृष्टीचें महान् प्रतीक आहे. नांवें निराळीं असलीं तरी तत्त्व एकच आहे, या सिद्धान्ताचा प्रत्यय दत्तमूर्ति घडवितें. शिवभक्त शैव आणि विष्णुभक्त वैष्णव यांनीं परस्पर संघर्ष करून आपापली देवता श्रेष्ठ–कनिष्ठ ठरविण्याचा वेडेपणा करूं नये, असा संदेश दत्तात्रेयाची त्रिमूर्ति सदैव देत आहे.

गेलीं दोन हजार वर्षें दत्तभक्ति महाराष्ट्रांत उत्कट स्वरूपांत नांदत आहे. भारतांत अन्यत्र निरनिराळ्या देवतांच्या उपासकांत संघर्ष झडत राहिले; परंतु महाराष्ट्रांत प्रायः संप्रदायांचे संघर्ष घडले नाहींत. 'साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपीं मिळाले।' अशी ऐक्याची भावना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांत अव्याहत आढळते. महाराष्ट्रानें आंधळी भक्ति कधींच केली नाहीं; त्यामुळें अंधपणांतून निर्माण होणारा अविवेकहि त्याच्या वांट्यास आला नाहीं. महाराष्ट्राच्या भक्तिपरंपरेंतील दत्तभक्तीचा प्रवाह हा जणुं महाराष्ट्राच्या विवेकबुद्धीचा, समन्वयी वृत्तीचा आणि पारमार्थिक अधिकाराचा निर्देशक आहे. महाराष्ट्रांत नाथ, महानुभाव, वारकरी, समर्थ, आनंद आणि दत्त असे अनेक भक्तिसंप्रदाय नांदले; परंतु या सर्व भक्तिसंप्रदायांतील संतांनीं दत्तात्रेयाचीं स्तुतिस्तोत्रें भावभरानें गायलीं आहेत.

नाथसंप्रदायाचा प्रवर्तक गुरु गोरक्षनाथ याच्यावर दत्तात्रेयाची कृपा होती. महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्रीचक्रधर यांच्या मार्गाचें 'आदिकरण' दत्तात्रेयच. वारकरी संप्रदायाचे संजीवक श्रीज्ञानेश्वर यांनीं 'ज्ञानदेवाचें हृदयीं। दत्तात्रेय योगिया' अशी दत्तभक्तीची ग्वाही दिली आहे. ज्ञानेश्वरांच्या भागवत धर्माची पताका उंच फडकवीत ठेवणारे श्रीएकनाथ हे मूलतः दत्तभक्तीच्या परंपरेंतले. 'दत्त जनीं दत्त वनीं। दत्तरूप हे अवनी।' असा त्यांचा व्यापक अनुभव आहे. एकनाथांच्या काळीं आंबेजोगाईस रहाणारे दासोपंत हे तर दत्तवेडेच होते. त्यांच्या समुद्राएवढ्या साहित्यांत सर्वत्र दत्तभक्तीचें माधुर्य ओथंबून आलें आहे. पेशवाईच्या काळांतील एक थोर सत्पुरुष निरंजन रघुनाथ यांनीं तर दत्तसाक्षात्कारासाठीं हाडाचीं काडें केलीं आणि गिरनारच्या शिखरावर, दत्तविरह असह्य झाल्यावर दगडावर डोकें आपटून प्राण देण्याची तयारी ठेवली

होती. अलीकडच्या काळांतहि नारायणमहाराज जालवणकर, अक्कलकोटच स्वामीमहाराज, वासुदेवानंदसरस्वती, पंतमहाराज बाळेकुंद्रीकर आणि या सर्वांची प्रभावळ दत्तभक्तीच्या अखंड प्रवाहाची आणि जिवंतपणाची साक्ष देत आहे.

वाडीच्या वाटेवरून गाडी चालू असतांना हा सर्व इतिहास मनांत दाटून येतो. ज्याच्या पदकमळांभोंवतीं भक्तांचे हृदयभ्रमर सदैव रुंजी घालीत होते, त्या दत्तात्रेयाच्या पादुका आपणहि डोळांभरून पहाव्या, त्यांपुढें माथा नमवावा, अहंकार निपटून टाकावा आणि विनयाचें लेणें मागावें, अशी ओढ मनाला वाटूं लागते. विशेषतः वाडीला असलेल्या पादुकांच्या दर्शनाचा महिमा तर विशेषच आहे. कारण त्या पादुका अमूर्त दत्तात्रेयाच्या नसून दत्तरूप बनलेल्या एका सगुण–साकार महामानवाच्या आहेत – वाडीला बारा वर्षें निवास करणाऱ्या नरसिंहसरस्वतींच्या आहेत.

मनोहर पादुका :

वाडी हें नांवाप्रमाणेंच एक खेडेंगांव आहे. येथें ब्राह्मण पुजाऱ्यांचीं बरींच घरें आहेत. सर्व वस्ती कृष्णेच्या कांठावरच एकवटली आहे. मोटारींतून उतरल्यावर आपणांस दर्शनापूर्वी कृष्णास्नान करावयाचें आहे. ज्या घाटावर स्नान करावयाचें त्याच घाटावर श्रीगुरूंच्या पादुकांचें मंदिर आहे; त्यामुळें दर्शना-साठीं कुठें दूर जावें लागत नाहीं. जणुं अंतर्बाह्य निर्मळ झाल्या-बरोबर, कुठेंहि शोध न घेतां, अंतःकरणांतच प्रभुदर्शन होतें, हा संदेश देण्यासाठींच इथें स्नानाच्या घाटावर पादुका स्थापिल्या असाव्यात असें वाटतें.

वाडीचा कृष्णाघाट प्रशस्त आहे. हा घाट चार टप्प्यांनीं चढत गेला आहे. इथें कृष्णेचा प्रवाह खळाळून वहात आहे. गुरुदेवांच्या स्पर्शानें पावन झालेल्या तीरावरील भूमीला आत्रेगानें

मिठी देण्याची तिलाहि जणुं ओढ असावी. पादुकांच्या समोरून कृष्णा वहात चालली आहे आणि जवळच उजव्या बाजूनें पंचगंगा धांवत चालली आहे. दत्तदर्शनाचा आनंद पंचगंगेच्या हृदयीं रिचविण्याची घाई कृष्णेला झाली आहे आणि जवळच एक फर्लांग अंतरावर, तिनें पंचगंगेशी मिळणी साधली आहे.

सरितासंगम आणि गिरिशिखरें यांच्या दर्शनानें भारतीय मनाला कांही तरी दिव्य, भव्य अनुभवास येतें. तेथें त्याला तीर्थरूपता जाणवूं लागते. या जाणीवेच्या पोटींच अनेक गिरिशिखरांवर शिवमंदिरें निर्माण झालीं आहेत आणि संगमावर तीर्थमहिमा नांदत राहिला आहे. दोन सरितांचा संगम मानवाला समतेचा, अभेदभावाचा संदेश देत असतो. संगमांत एकरूप होणाऱ्या दोन सरितांचीं जीवनें पुढें आपलीं विभिन्न नामरूपेंहि विसरून जातात आणि पुनः कधींहि विभक्त न होतां एकजीव होऊन वहात रहातात. जणुं याचमुळें संगमभूमीच्या सान्निध्यांत साधुसंत तपें आचरतात.



श्रीदत्तपादुकामंदिर व कृष्णेचा घाट-
नरसोबाची वाडी

हें कृष्णा-पंचगंगेचें संगमस्थान नरसिंहसरस्वतींनीं एक तपाएवढा काळ आपल्या निवासानें पुनीत केलें आहे. या संगमजळांतील चौसष्ट योगिनी त्यांच्या चरणसेवेंत चूर होत्या; असें गुरुचरित्रांत लिहिलें आहे. औदुंबराहून

ते इथें आले आणि इथें बारा वर्षें राहून, अनेक दीन–दलितांच्या जीवनांत समाधानाचे नि सुखाचे मळे फुलवून, अनेकांचीं संकटें दूर करून, मदांधांचा अहंकार निपटून टाकून, धर्मावरील आघात नष्ट करून आणि भक्त–भाविकांच्या श्रद्धा पालवून ते पुढें गाणगापूरला आले. बेदर आणि विजापूर येथील सुलतानशाहीच्या अमलामुळें संत्रस्त झालेल्या प्रजेच्या मनांत त्यांनीं धर्मनिष्ठा आणि निर्भयता निर्माण केली आणि आपल्या तपोबळानें प्रत्यक्ष बेदरच्या मुसलमान राजालाहि आपल्या चरणीं नमविलें. मानवाची आत्मशक्ति जर जागी असेल, तर कोठलीहि पाशवी शक्ति त्याला दडपूं शकणार नाहीं, हा नरसिंहसरस्वतींच्या अवतार–चरित्राचा बोध–पाठ आहे.

कृष्णेच्या पैलतीरावर औरवाड आणि गौरवाड या नांवाचीं दोन गांवें आहेत. हीं दोन गांवें विजापूरच्या आदिलशहानें वाडीच्या दत्तपूजेसाठीं इनाम दिलेलीं आहेत. हें पैलतीरावरील औरवाड म्हणजेच गुरुचरित्रांत उल्लेखिलेलें अमरापूर होय. या अमरापुरांत अमरेश्वर नांवाचें शिवस्थान आहे. ज्याला आज आपण 'नरसोबाची वाडी' म्हणतों, तें स्थान श्रीगुरुंच्या आगमनापूर्वीं अमरापुरांतच समाविष्ट आहे. या अमरापुराचा आणि त्याच्या सान्निध्यांतील कृष्णा-पंचगंगा-संगमाचा महिमा गुरुचरित्रांत असा वर्णिला आहे :

पंचगंगानदीतीर । प्रख्यात असे पुराणांतर ।
पांच नामें आहेति थोर । सांगेन ऐका एकचित्तें ॥


शिवा भद्रा भोगावती कुंभीनदी सरस्वती ।
'पंचगंगा' ऐसी ख्याति । महापातक संहारी ॥

ऐसी प्रख्यात पंचगंगा । आली कृष्णेचिया संगा ।
प्रयागाहूनि असे चांगा । संगमस्थान मनोहर ॥

अमरापुर म्हणिजे ग्राम । स्थान असे अनुपम ।
जैसा प्रयाग संगम । तैसें स्थान मनोहर ।।


वृक्ष असे औदुंबरु । प्रत्यक्ष जाणा कल्पतरु ।
देव असे अमरेश्वरु । तया संगमां षट्कुळीं ।।

कृष्णेच्या वहात्या प्रवाहांत स्नान करतांना त्या महापुरुषाचा महिमा आठवून मनांतली श्रद्धा दृढावते. वाटतें, जोंवर या भरतभूमींत आत्मतेजानें तळपणारे असे तपाचे हिमालय निर्माण होतात, तोंवर जगांत पाशवी वृत्तीचें कितीहि थैमान चालू राहिलें, तरी भरतभूमि आपली विश्वशांतीची महायात्रा चालू ठेवील.




कृष्णाघाट आणि त्यावरील वाडीचें क्षेत्र

स्नान करून घाटाचा पहिला टप्पा चढून झाल्यावर प्रशस्त फरसबंदी भूमीवर लहानसें दत्तपादुकामंदिर दिसतें. या पादुकांना 'मनोहर पादुका' अशी संज्ञा आहे. पादुकांवरील मंदिर आठ खांबांवर उभें आहे. मंदिर उंचीलाहि अगदीं कमी आहे. मंदिराचा



मनोहर पादुकांचें मंदिर, नरसोबाची वाडी

आकार १२ फूट × २३ फूट एवढा आहे. या मंदिरावर शिखर नाहीं. वर धाब्याच्या घरासारखें सपाट छप्पर आहे. मंदिराचे मागील चार खांब भिंतींत सामावले आहेत. मध्यभागीं पादुकांचा लहानसा गाभारा आहे. मंदिराच्या मागें चार थरांनीं उतरता होत गेलेला औदुंबराचा पार आहे; परंतु पाराच्या मानानें औदुंबर अगदींच लहान आणि निष्पर्ण आहे. त्याची निष्पर्ण अवस्था पाहून मन उदास होतें आणि मनांत असा विचार डोकावतो कीं, या औदुंबराला पालवी फुटण्यासाठीं भक्तिगंगेचेंच पाणी हवें. अश्रद्धेच्या उन्हाळ्यांत भक्तिगंगा आटून जायला लागल्यावर तो विचारा औदुंबर तरी कसा पालवणार आणि मानवांना दत्तकृपेची स्निग्धशील छाया तरी कशी लाभणार ?




'मनोहर पादुका'

दुपारीं बारा वाजतां या मनोहर पादुकांची महापूजा होते. महापूजेच्या वेळीं पुजारी पादुकांवर लोटीभर दूध ओततात आणि त्यानंतर त्या अमृताच्या अभिषेकानें मनोहर पादुका दर्शनेच्छूंच्या डोळ्यांत प्रतिबिंबित होतात. दर्शनाच्या आनंदानें डोळे पाणावतात आणि मुखांतून आपोआपच श्रीगुरुस्तोत्र स्रवूं लागतें—

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु' गुरुर्देवो महेश्वर ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

मंदिराच्या दोन्ही बाजूंस समोरच्या कोपऱ्यांवर दगडी तुळशी-वृंदावनें आहेत. दत्तपादुकांचें दर्शन घेऊन डावीकडे वळलें कीं, एक लहानसें राममंदिर दिसतें. या मंदिराला पुढें एक बैठा मंडप आहे. आंत राम-सीतेच्या उभ्या मूर्ति आहेत. या मंदिरापासून घाटाच्या



श्रीराममंदिर : नरसोबाची वाडी

पायऱ्यांच्या दुसऱ्या थरापयत ओळीन आठ ओवऱ्या आहेत. राममंदिराजवळ उभें राहिल्यावर डावीकडे कृष्णा-पंचगंगा-संगम आणि त्यापलीकडे, कुरुंदवाडच्या बाजूनें संगमावर उतरण्यासाठीं असलेला भव्य ‘ कुरुंदवाड घाट ’ नजरेस पडतो.

९४७२०० (३८८३)

**मुक्तेश्वराची काव्यस्फूर्ति :**

कुरुंदवाडपासून एक मैलावर मुक्तेश्वराचें तेरवाड गांव आहे. व्यास—वाल्मीकींच्या प्रतिभेचा वारसा घेऊन आलेला हा मराठीचा महाकवि शेंकडों रसिकांचा प्यारा आहे. त्यानें रचलेल्या मराठी महाभारताची मोहिनी अपूर्व आहे. उत्तुंग कल्पनाशक्ति, भावनेचा अबाध प्रवाह आणि भाषेचा रमणीय विलास यांमुळें त्याचें काव्य सरस सुंदर झालें आहे. प्राचीन मराठी साहित्यांत एकमेव कला-कवि म्हणून त्याचें स्थान आहे. आज त्याच्या महाभारताचीं पांचच पर्वें उपलब्ध झालीं आहेत; परंतु तेवढ्या भागाच्या वाचनानें रसिकांना उर्वरित भागाच्या अभावाची चुटपूट लागून रहाते. मानवी स्वभावाचे अनेक नमुने आणि ऋतुचक्रांतील सौंदर्याच्या अनेक हृदयंगम छटा त्यानें प्रभावीपणें चितारल्या आहेत.

मुक्तेश्वर हा नाथांच्या मुलीचा मुलगा. नाथ जसे दत्तोपासक होते, तसा हा त्यांचा शारदोपासक नातूहि दत्तभक्त होता. तो स्वतःला दत्ताच्या पदकमळांतील भ्रमर म्हणवीत असे. दत्तभक्तीचा वारसा त्यानें आपल्या आजोबांकडून मिळविला; परंतु त्याचें गांव नरसोबाच्या वाडीपासून जवळ असल्यामुळें तो दत्तभक्तीचा जन्म-जात अंकुर पुढें फोफावत गेला आणि वाङ्मयाच्या फळा-फुलांनीं बहरला.

चिन्मूर्ती लीला विश्वंभरु । दत्तात्रेय जगद्गुरु ।
त्याचेनि प्रसादें मुक्तेश्वरु । कथा बोले भारती ॥

अशी दत्तकृपेविषयीं प्रत्यक्ष मुक्तेश्वराची साक्ष आहे. तेरवाडला अजूनहि मुक्तेश्वरानें उभारलेलें दत्तमंदिर उभें आहे व त्या मंदिरांत या कवीश्वरानें जीवेंभावें पूजिलेल्या दत्तपादुका आहेत. महाभारता-प्रमाणेंच रामायण हाहि मुक्तेश्वरानें आपल्या काव्याचा विषय बनविला होता. आजवर त्याची रामायणावरील रचना अज्ञात

होती. नुकतेंच त्याचें ओवीबद्ध लघुरामायण उपलब्ध होऊन प्रसिद्ध झालें आहे आणि उत्तरकांडाची एक अपूर्ण प्रत श्री. वि. अं. कानोले या संशोधकांना सांपडली आहे. नाथांनीं रचलेल्या भावार्थरामायणाची पूर्ति गावबा नांवाच्या त्यांच्या शिष्यानें केली, असें सांगतात. कदाचित् आजोबांचें तें अपूर्ण कार्य या समर्थ नातवानेंहि स्वतंत्रपणें पूर्ण केलें असेल आणि त्या कामापैकींच हें रामायणाचें उत्तरकांड असेल. अलीकडेच नाथांच्या भावार्थरामायणाची म्हणून एक हस्तलिखित प्रत माझ्या पहाण्यांत आली. त्या प्रतींत जें उत्तरकांड आहे, तें मुक्तेश्वरकृत आहे. आश्चर्य असें कीं, या रामायणरचनेची स्फूर्ति मुक्तेश्वराला वाडीस नरसिंहसरस्वतींच्या चरणीं लाभली. उत्तरकांडाच्या अखेरीस मुक्तेश्वर म्हणतो :

येका जनार्दना शरण । उत्तरकांड रामायेण ।
संतकृपेनें जालें संपूर्ण । सकळलोकतारक ॥ २०१ ॥

पवित्र सरिता कृष्णवेणी । पंचगंगा समस्थानीं ।
नृसिंहसरस्वतींचे चरणीं । ग्रंथप्रसाद लाधला ॥ २०२ ॥


तेथ जाली देववाणी । ग्रंथ पावावा प्रतिष्ठानीं ।
येकनाथाचिये सदनीं । विस्तारेल जनमुखे ॥ २०३ ॥

यावरून हें दिसून येतें कीं, इथेंच कृष्णा-पंचगंगा-संगमावर या मनोहर पादुकांच्या सान्निध्यांत मुक्तेश्वराला रामायणरचनेचा प्रसाद प्राप्त झाला आणि दत्तात्रेयाच्या आंतरिक आदेशानुसार त्यानें तो ग्रंथ पैठणास एकनाथांच्या घरीं पूर्ण केला.

__तपोनिधींचीं स्मारकें :__

मुक्तेश्वराप्रमाणें अनेक साधकांना इथें परमार्थाची प्रेरणा लाभली आणि त्यांनीं जीवनांत कृतार्थता प्राप्त केली. मनोहर

पादुकांच्या उजव्या बाजूनें आपण संपूर्ण घाट चढून वर गेलों कीं, अगदीं समोर श्रीवासुदेवानंदसरस्वती ऊर्फ टेंभेस्वामी (शके १७७६–१८३६) यांचें स्मृतिमंदिर आहे. टेंभेस्वामी



वासुदेवानंद सरस्वतींचें स्मृति मंदिर, नरसोबाची वाडी

ही आधुनिक काळांत झालेली एक महान् दत्तविभूति समजली जाते. सावंतवाडीजवळील माणगांव हें त्यांचें गांव. लहानपणींच त्यांनीं शास्त्राध्ययन पूर्ण केलें आणि घराण्यांत रूढ असलेल्या दत्तभक्तीचा वारसा समृद्ध केला. नरसोबाची वाडी हेंच त्यांचे प्रेरणास्थान. येथून प्रेरणा घेऊन आणि अधूनमधून कांहीं काळ येथें (व औदुंबर येथें) तप आचरून त्यांनीं माणगांव येथें दत्तमंदिर उभारलें आणि अत्यंत निग्रहानें तनमनधन वेंचून दत्तोपासना आरंभिली. पुढें कांहीं काळानें (वयाच्या पसतिसाव्या वर्षी) त्यांनीं घर कायमचें सोडलें आणि भ्रमंती सुरु केली. शके १८१२ मध्यें, या भ्रमणकाळांतच गंगाखेड येथें त्यांची पत्नी निवर्तली; त्यानंतर १३ दिवसांनीं त्यांनीं संन्यास स्वीकारला आणि संन्यासधर्माचा

आदर्श निर्माण करून अनेकांना दत्तभक्तीचें वेड लावलें. संन्यस्तावस्थेंत त्यांनीं अखेरपर्यंत भारतभर भ्रमण केलें. त्यांच्या अद्‌भुत सिद्धीच्या आणि प्रगल्भ प्रज्ञेच्या आठवणी आजहि लोक सांगत असतात. टेंभेस्वामींच्या जीवनकार्यानें आधुनिक काळांत दत्तसंप्रदाय प्रभावी बनला. त्यांनीं दत्तोपासनेवर समुद्राएवढें साहित्य निर्माण केलें आहे. चार हजार पृष्ठांवर त्यांचा साहित्यसंभार आहे. ही साहित्यरचना संस्कृत व मराठी अशा दोन्ही भाषांत आहे. गुरुचरित्राचें त्यांनीं संस्कृत रूपांतर केलें आहे. संस्कृत 'दत्तपुराण' आणि मराठी 'दत्तमहात्म्य' हे त्यांचे दोन ग्रंथ दत्तचरित्रावरील प्रमाणग्रंथ आहेत. त्यांची स्तोत्रादि स्फुटरचना भक्तिभावनेनें ओतप्रोत भरलेली आहे.

वास्तविक टेंभेस्वामींचें समाधिस्थान नर्मदातटाकीं गरुडेश्वर येथें आहे; परंतु वाडीविषयींचा त्यांचा भक्तिभाव ध्यानीं घेऊन श्रीमंत लक्ष्मीबाईसाहेब जाधव (ग्वाल्हेर) यांनीं वाडी येथें हें स्मृतिमंदिर जून १९३५ मध्यें उभारलें.

दत्तात्रेया श्रीगुरुराया,
मजला भेट द्या हो !
रात्रंदिन हृदयांतरिं आशा
लागलि दृढतर पुराणपुरुषा
पूर्ण करावी श्रीजगदीशा
इतुकें मागणें हो !

हीच या सत्पुरुषाची एकमेव इच्छा होती. दत्तगुरूंनीं ती पूर्ण केली.

टेंभेस्वामींचें हें मंदिरहि मनोहर पादुकांच्या मंदिराच्या धर्तीचेंच आहे. दोन्ही मंदिरांच्या दगडी खांबांच्या मोकळ्या मंडपाला व्यापून टाकणारी गजांची व लोखंडी पट्ट्यांची जाळी

अनुक्रम ७५२९ ... वि. ... २५ अंक ...२०६ ... ता. २४।३।७५



बसविली आहे आणि मूळचें पाषाणाचें स्वरूप काचेचा रंग फांसून 'प्रेक्षणीय' बनविलें आहे.

टेंभेस्वामींच्या स्मृतिमंदिरामागें श्रीरामचंद्र योगी यांचें स्मृतिस्थान आहे, हे रामचंद्र योगी नरसिंहसरस्वतींच्या काळांतले. या स्थानीं नरसिंहसरस्वतींचा निवास होण्यापूर्वींच ते तेथें येऊन तप करीत राहिले होते. जेव्हां श्रीगुरु येथें आले तेव्हां यांनीं त्यांना विनीतभावानें गौरविलें आणि त्यांच्या चरणसेवेंत स्वतःचें जीवन कृतार्थ बनविलें. एवढा मोठा अधिकारी योगी, परंतु त्याच्या हृदयांत अहंकाराचा लेश नाहीं. श्रीगुरूंच्या चरणांची जवळीक लाभली, हा त्यांना आनंदाचा महान् निधिच वाटला. या धन्यतेच्या जाणिवेंतच एक दिवस त्यांनीं कृष्णाकांठीं देहाचा निरोप घेतला. त्यांची पुण्यतिथि ज्येष्ठ वद्य चतुर्दशीला असते. कृष्णेच्या पुरांत श्रीगुरूंच्या पादुका जलमग्न झाल्यावर पुजारी रामचंद्रयोग्यांच्या समाधीचें पूजा करून नित्योपासना साधतात.

त्यांच्या समाधीसमोर पिंपळाचा पार आहे. त्या पारावर दोन शिवलिंगें, नंदी आणि पादुका आहेत. समाधीच्या मागेंहि पिंपळाचा पार असून त्यावर शिवलिंग आहे. वासुदेवानंदसरस्तींच्या स्मृतिमंदिरापासून क्रमानें एका पंक्तींत अनेक तपोनिधींचीं स्मारकें आहेत आणि शेवटीं श्री. मल्हार श्रीनिवास वेळ्कोटकोर यांनीं उभारलेला दुमजली सुंदर मठ आहे. प्रथम नारायणस्वामी, पुढें काशीकरस्वामी, गोपाळस्वामी, मौनीस्वामी या क्रमानें हे तपोनिधि या पवित्र तपोभूमींत विसांवले आहेत. त्यांच्या तपानें कृष्णाकांठ पावित्र्याची खाण बनला आहे.

या सर्व तपस्व्यांत नारायणस्वामींची कीर्ति अमाप आहे. ते तासगांवजवळील विसापूरचे गार्ग्यगोत्री देशस्थ ब्राह्मण. त्यांनीं अल्पवयांतच वेदाध्ययन पूर्ण केलें. त्यांच्या घरीं अग्निहोत्र होतें.

परंतु पत्नी निवर्तल्यामुळें अग्निहोत्रांत खंड पडण्याची वेळ आली. त्यासाठीं त्यांनीं ताराळ्याच्या श्रीराम दीक्षितांच्या कन्येशीं द्वितीय विवाह केला. त्यानंतर एकदां पुण्याच्या विद्वत्सभेंत शास्त्रचर्चा चालू असतांना यांना पराभव पत्करावा लागला. या पराभवाचें शल्य उरीं वागवून घरी जातात तों द्वितीय पत्नीहि निवर्तली. प्रथम-पत्नीपासून एक मुलगा (विश्वंभर) आणि द्वितीय पत्नीपासून दोन मुली झालेल्या होत्या. या तीन मुलांना घेऊन त्यांनीं घर सोडलें आणि मानसिक शांति मिळविण्यासाठीं वाडीची वाट धरली.

वाडीस आल्यावर त्यांनीं अनेक दिवस निग्रहानें योग-साधना केली आणि समाधिसिद्धि प्राप्त केली. एके रात्रीं समाधि लावून बसले असतां त्यांना सूर्योदयाचेंहि भान राहिलें नाहीं. घरांत तीन मुलें. कुणीं तरी मुलांची व्यवस्था पाहिली. समाधि उतरविल्यावर जेव्हां त्यांना मुलांची जाणीव झाली तेव्हां त्यांचें मन खिन्न झालें. बराच विचार करून त्यांनीं ब्राह्मविवाहपद्धतीनें मुलींचे विवाह उरकले आणि मुलालाहि गृहस्थाश्रमाची दीक्षा देऊन मार्गीं लावलें. अशी निःसंग स्थिति प्राप्त झाल्यावर त्यांनीं संन्यास घेतला. संन्यस्तावस्थेंत त्यांनीं अनेक साधकांना आणि मुमुक्षूंना मार्गदर्शन करून परमार्थाची वाट सुलभ करून दिली. चैत्र वद्य ३० शके १७२७ या दिवशीं त्यांनीं जिवंत समाधि घेतली. सध्यां त्यांचे कन्या-वंशज कर्नाटकांत रट्टेहळ्ळीस नांदतात.

नारायणस्वामींनीं लिहिलेल्या ग्रंथांपैकीं 'आनंदसागर' या नांवाचा एक लघुग्रंथ साठ वर्षांपूर्वी कुरुंदवाडहून प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथांची विभागणी सात अध्यायांत (सिद्धान्तांत) केलेली असून, ओवीसंख्या ४०५ आहे. हा ग्रंथ गुरु-शिष्य-संवादात्मक आहे. नारायणस्वामींना तपश्चर्येनें व दत्तात्रेयाच्या अनन्यभक्तीनें जो आनंदाचा ठेवा लाभला, त्याचेंच रहस्य त्यांनीं

या लघुग्रंथांत विवरिलें आहे. "कामनेमुळें मनुष्य दुःखी होतो. कामनेचा त्याग करून आणि विश्वजीवनाच्या सिंधूंत व्यक्ति-जीवनाचा बिंदु मिसळून राहिलें कीं, सारा आनंदच अनुभवास येतो" असा सिद्धान्त त्यांनीं स्वानुभवानें सांगितला आहे.

पाहे आपलें अंतरंग। जेथून येतो सुखतरंग।
बा रे तूंतें सुखसंग। अखंड आहे अंतरीं॥

बिंदू सर्वथा त्यजावा। सिंधूकडे डोल द्यावा।
मग कल्पकोटी भोगावा। आनंदाचा सोहळा।

हा 'आनंदाचा सोहळा' अखंड भोगणारे नारायणस्वामी तुम्हां-आम्हां स्खलनशील मानवांसाठीं आणि परमार्थाच्या यात्रिकांसाठीं श्रीगुरूंची सदैव प्रार्थना करीत आहेत :

आतां ऐसी वदवी वाणी। नासे कामनापापिणी।
प्रीति वाढे तुझे चरणीं। आनंद लोटे साधकां॥

वाडीच्या क्षेत्रविधींत यांचा अधिकार एवढा मोठा आहे कीं, श्रीगुरूंच्या पादुकांचें पूजन होण्यापूर्वी यांच्या समाधीचें पूजन केलें जातें. टेंभेस्वामींनीं आपल्या 'युवशिक्षा' या ग्रंथांत नारायण-स्वामींच्या पारमार्थिक अधिकाराचा गौरव करतांना म्हटलें आहे :

कृष्णापञ्चमदीयोगेऽभ्यर्च्य श्रीदत्तपादुके।
भक्त्या नारायणस्वामी जीवन्मुक्तोऽधुनाऽभवत्॥

[ कृष्णा-पंचगंगा-संगमावर श्रीदत्तपादुकांचें भक्तीनें अर्चन करून, आधुनिक काळांत श्रीनारायणस्वामी जीवन्मुक्त बनले. ]

येथील तपोनिधींच्या मेळाव्यांतील मौनीस्वामी यांनीं एक तपपर्यंत अनवाणी पायांनीं काशी-रामेश्वर यात्रा केल्या. त्यानंतर वाडीला येऊन राहिल्यावर एक तपपर्यंत मौनव्रताचें परिपालन केलें.

त्यामुळें त्यांना 'मौनी' स्वामी हें नांव मिळालें. शके १८१३ मध्यें त्यांनीं वाडीस एक महायज्ञ पार पाडला.

—असा आहे या तपोभूमीचा इतिहास. पंधराव्या शतकाच्या मध्यापासून विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत सतत पांचशें वर्षें इथें अनेक ज्ञात-अज्ञात महापुरुषांनीं तपांचीं गौरीशंकरें उभीं केलीं आणि आपल्या आत्म्याच्या उंचीपुढें अस्मानालाहि ठेंगणें बनविलें. मनांत विचार येतो-ज्यांच्यामुळें या अनेक साधकांना प्रेरणा लाभली आणि सिद्धि प्राप्त झाली, त्या नरसिंहसरस्वतींची योग्यता शब्दांत ग्रथित करणें कसें शक्य आहे? जनार्दनस्वामींनीं त्यांच्याविषयींची भक्ति व्यक्त करतांना म्हटलें आहे :

गुरु गीतीं गावा भावें चित्तीं ध्यावा ।
सगुण पहावा डोळेभरीं ॥
जनार्दन म्हणे तीर्थें त्याचेपाशीं ।
चारी मुक्ती दासी होती त्याच्या ॥

या महिम्यामुळें वाडीला नेहमींच यात्रा असते. चातुर्मास सोडून दर शनिवारीं इथें श्रींची पालखी निघते. पिशाच्चांनीं पछाडलेलीं आणि भवतापानें पोळलेलीं अनेक माणसें मुक्त होण्यासाठीं इथें धांव घेतात. संध्याकाळीं आरतीच्या वेळीं धुपाचा वास दरवळला कीं, पिशाच्चाची बाधा झालेल्या माणसांच्या अंगांत वारें येतें. त्यांचे अंगविक्षेप, दांत-ओठ खाणें, कर्कश ओरडणें प्रेक्षकांच्या अंगावर कांटा उभा करतें. बुद्धिवादी संशोधकांनाहि विस्मित करणारा हा प्रकार आहे. श्रीगुरूंच्या पदप्रभावानें तीं भुतें माणसांचा आश्रय सोडतात आणि कृष्णेच्या प्रवाहांत बुडी घेतात, असा अनेक जीवांचा अनुभव आहे.

वाडीचें आध्यात्मिक वैभव मोठें असूनहि या क्षेत्राची वाढ झाली नाहीं. बेदर आणि विजापूर या ठिकाणच्या यवन राजांची

श्रीगुरुंवर श्रद्धा होती; परंतु त्या वैभवशाली आणि विलासप्रिय यवनांनींहि इथें एखादी भव्य वास्तु उभारलेली नाहीं. नंतरच्या पांचशें वर्षांच्या काळांतहि असा एखादा दानवीर या स्थानाला लाभला नाहीं, कीं जो या स्थानाचें बाह्य वैभव वाढवील. कदाचित विजनवासी दिगंबर दत्तगुरूला आणि त्याच्या परंपरेंतील सत्पुरुषांना असलें वैभव रुचणारहि नाहीं. त्याचमुळें येथील गुरुपादुकांचें मंदिर आणि इतर सत्पुरुषांच्या स्मारकांचा समूह बाह्य दृष्टीला प्रेक्षणीय वाटणारा नाहीं. कृष्णेचा वेगवान प्रवाह दिवसेंदिवस घाटाला कापून वहात आहे. यात्रिकांच्या सोयीसाठीं उभ्या असलेल्या ओवऱ्या उद्‌ध्वस्त झाल्या आहेत. कांहीं काळापूर्वी संस्थानिकांनीं सुरू केलेलीं अन्नछत्रें आज बंद पडलीं आहेत. हें सर्व पाहून मन कांहींसें विषण्ण होतें. पुन्हा एखादा तेजस्वी महापुरुष या भूमींत येऊन राहिल्याशिवाय जुन्या कोमजलेल्या श्रद्धेला नवीन उजळा मिळणार नाहीं असें वाटतें.

दत्तोपासनेचा संप्रदायच आज विस्कळित बनलेला आहे. सदाचारांतून आत्मोन्नति साधण्यासाठीं सदैव प्रयत्न करणें, मनःशुद्धि साधून तप आचरणें आणि तपांतून लाभलेल्या तेजानें इतरांना सन्मार्गाला लावणें हें कार्य करणाऱ्यांची वाण आहे. आत्मोन्नतीसाठीं स्वयंप्रेरणेनें प्रयत्न करण्याची प्रवृत्ति ढळून, नित्याच्या प्रापंचिक उपाधि दूर करण्यासाठीं आणि ऐहिक गरजा भागविण्यासाठीं श्रीगुरूंचे पाय धरण्याची वृत्तिच बळावत आहे. ही प्रवृत्ति नष्ट करून संप्रदायाचें व्यापक संघटन करणारा अनुभवी सत्पुरुष आज हवा आहे. जुन्या श्रद्धाकेंद्रांविषयींचा जनमनांतील जिव्हाळा अजूनहि जिवन्त आहे. तो नष्ट न करतां, त्याचा लाभ घ्यावयास हवा. तो जिव्हाळा अधिक डोळस बनवून, हीं जुनीं श्रद्धाकेंद्रें संस्कृतीच्या विकासाचीं विद्यापीठें बनवावयास

हवींत. अर्थात् हें कार्य सोपें नाहीं. युगधर्माचें भान ठेवून चिरंतन मूल्यांची उपासना करणारी विभूतिच असें कार्य करूं शकते.

दत्तात्रेय हा 'स्मर्तृगामी'-स्मरण करणाऱ्यापुढें 'दत्त' म्हणून उभा राहणारा आहे. त्यानें पुनः श्रीनरसिंहसरस्वतींसारख्या महान् विभूतीच्या रूपानें प्रकटावें, यासाठीं आपण सर्व जण हृदयाच्या गाभ्यांतून त्याला हांक देऊं या—

"श्रीगुरुदेव दत्त !"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(स्थळ प्रत)

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून–‘ कांहींतरी ’ नवेंच करण्याची ईर्ष्या बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें

**तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना**

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३.रा.शिक्षणाचा ध्यास: विजापूरकर
४, कादंबरीकार हरिभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य: माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजेलो
९. चित्रपट महर्षि .दादासाहेब फाळके
१० इतिहासाचार्य राजवाडे:राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३ वीरबाला झोया : ( रशियांतील )
१४ बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५ कोई भी चीज उठाव : वूलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर: अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी-मुद्रण प्राणदाता:जावजी
२१. राजमाता जिजाबाई :
२२. स्वदेशी कारखानदार : काळे
२३. भव्य स्थापत्य : लेसप्स (सुएज)
२४. सर्कस बहाद्दर : विष्णुपंत काळे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६ सद्गुणी बनण्याची कला :
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशाकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी बाळू
३१. चिरंजीव मरण: मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक: शंकराचार्य
३४ बंडखोर लोककवि : अनंतफंदी
३५ साकार संगीत : पं. पलुस्कर
३६. साहसी वैमानिक : सँटाड्यूमा
३७. दर्याचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादुगार . डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ:भाऊराव पाटील
४१. मराठी मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२ बर्फातला माणूस : जेम्स हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५ प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६ नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७ असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि पटेल
४९. पहिला मिशनरी : गजानन वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें?

**प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : प्रश्नपत्रिकेसह संच-पेटी ५५ रुपये**

# कथासरित्सागर

## सुप्रसिद्ध संस्कृत कथासरित्सागर या ग्रंथांतील निवडक दहा अद्‌भुतरम्य कथा

★

अनुवादक : प्र. शं. जोशी

इसवी सनाच्या पहिल्या शतकात प्रतिष्ठान (पैठण) नगरात शालिवाहनाच्या राजसभेंत गुणाढ्य नांवाचा महाकवि होता. गुणाढ्याला व्यास महर्षींचा दुसरा अवतारच मानतात. त्यानं 'पैशाची' या प्राकृत भाषेंत लिहिलेल्या 'बृहत्कथा' या प्रचंड ग्रंथावरून सोमदेवानें अकराव्या शतकांत 'कथासरित्सागर' हा ग्रंथ संस्कृत भाषेंत तयार केला. 'कथासरित्सागरा'चे नायक वत्सराज उदयन व त्याचा मुलगा नरवाहनदत्त. यात अनेक स्वतंत्र उपकथा असून छोट्या स्फुटकथांना तर अंतच नाही. त्यांतील कांहीं मुख्य कथाचा सर्वसामान्य मराठी वाचकांना सुटसुटीतपणें परिचय करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

★

### तीन भागांत

पहिला भाग : दुसरा भाग :

१. महामति व... ...मी विदूषक

२. महाकवि ग... ...राज उदयन

३. साहसी श्र... ...राज शक्तिदेव

REFBK-0017200

७. स्वाभिमानी गुणशर्मा


८. शापभ्रष्ट श्रीदर्शन

९. बाहुशाली भीमभट

१०. सम्राट विक्रमादित्य

★

प्रत्येक भाग रु. १—६०; तीन भाग रु. ४—८०




पंढरपूर–पांडुरंग, सज्जनगड – रामदासस्वामी, आळंदी – ज्ञानेश्वर, पैठण – एकनाथ, जेजुरी – खंडोबा, देहू – तुकाराम, त्र्यंबकेश्वर-नाशिक श्रीराम, चिंचवड – मोरया गोसावी, कोल्हापूर – महालक्ष्मी, औदुंबर-नरसोबाची वाडी – दत्तात्रय; तुळजापूर–भवानी; नेवासें–मोहिनीराज, ज्ञानेश्वर, कवळें–शांतादुर्गा, मंगेश–शंकर, भीमाशंकर – ज्योतिर्लिंग, परशुराम – परशुराम, शिखर-शिंगणापूर – शिवाजी, हरिहरेश्वर – पेशवे, गाणगापूर – नरसिंह सरस्वती, माहूर – दत्त, देवी, आंबे जोगाई– देवी, औंढ्या नागनाथ – ज्योतिर्लिंग, परळी वैजनाथ – ज्योतिर्लिंग, वेरूळ – लेणी, ज्योतिर्लिंग नांदेड - गोदावरी, बीड – कंकालेश्वर, रामटेक – सीता-राम, सालबर्डी – यात्रा, अमरावती अंबादेवी, मुक्तागिरी – जैन-क्षेत्र, चांदा – महाकाली, शेगाव – गजानन महाराज, कौंडिण्यपूर – पांडुरंग, कळम्ब – चिंतामणी, दक्षिणद्वार देवगिरी दौलताबाद. * * *